आजचा शुभ विचार

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!



जेव्हा गरज असेल प्रसिद्धीची किंवा आपल्या व्यवसायाला चालना देण्याची
दैनिक स्वराज्यदूत
आपल्या पाठीशी आहे
आम्ही देत आहोत आपल्याला जलद गतीने प्रसिद्धीसाठी
छापील वृत्तपत्र आणि इ पेपर मध्ये जाहिरातीचा पर्याय
* फक्त २९९९ रुपयात ३० दिवस आपली कोणतीही जाहिरात प्रसिद्ध केली जाईल.
संपर्क -मो. ८४४६६ ७३६७७
स्वराज्यदूत NEWS MEDIA CHANNEL
वेबसाईट ला भेट द्या www.swarajyadoot.com

मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-52 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Friday 27 June 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५२ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शुक्रवार, दि. २७ जुन २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

## २८ तासांच्या प्रवासानंतर शुभांशू शुक्ला अंतराळात पोहोचले; ISA जोडले ड्रॅगन कॅप्सूल

विशेष वृत्तसेवा
दैनिक स्वराज्यदूत

------------------

भारताने अंतराळात मोठी झेप घेतली असून अंतराळवीर शुभांशू शुक्ला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचले असल्याची माहिती समोर आली आहे. शुभांशू शुक्ला आणि त्यांच्या टीमला घेऊन जाणारे ड्रॅगन कॅप्सून देखील यशस्वीरित्या ISAशी जोडले गेले आहे. गुरुवारी दुपारी ४ वाजता शुंभांशू शुक्ला यांचे ड्रॅगन कॅप्सूल आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचले आहेत. २८ तासांच्या प्रवासानंतर शुभांशू शुक्ला यांच्या ड्रॅगन कॅप्सूलची सध्या डॉकिंग प्रक्रिया सुरु आहे. अमेरिकेच्या स्पेसएक्स आणि ॲक्सिओम स्पेस यांच्या




ॲक्सिओम -४ मोहिमेअंतर्गत अंतराळात बुधवारी २५ जून रोजी शुभांशू शुक्ला यांनी आपल्या टीमसह उड्डाण केले होते. नासाच्या फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटरमधून त्यांनी उड्डाण केले. स्पेसएक्सचे फाल्कन-९ रॉकेटचा यामध्ये वापरण्यात आले आहे. भारतासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. भारतासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची आहे. भारताचे विंग कमांडर राकेश यांच्यानंतर अंतराळात जाणारे दुसरे भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला ठरले आहेत. २ आठवड्यांच्या कालावधीसाठी ही मोहीम असणार आहे. चारही अंतराळवीर १४ दिवस अंतराळात राहून विविध वैज्ञानिक, जैववैज्ञानिक आणि अभियांत्रिक प्रयोग करणार आहेत. या मोहिमेदरम्यान शुभांशू शुक्ला अंतराळात भारतीय संस्कृतीच्या विविध कलाकृतींचे आणि योगासनांचे सादरीकरण करणार आहेत. या मोहिमेत शुभांशू शुक्ला यांच्यासह इतर ३ आंतरराष्ट्रीय अंतराळवीर नासाच्या अंतराळवीर आणि A x - ४ मोहिमेच्या प्रमुख पेगी व्हिटसन, तसेच पोलंडचे स्लावोस उजनास्की-विस्निवेस्की आणि हंगेरीचे तिबोर काबू सहभागी झाले आहेत. दरम्यान, शुभांशू शुक्ला अंतराळात पोहचल्यानंतर त्यांच्या वडिलांनी त्यांच्यावर आनंद व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले की, "आम्हाला खूप आनद होत आहे. मी देवाचे यशस्वी डॉकिंगबद्दल आभार मानतो. आम्हाला आमच्या मुलाचा खूप अभिमान आहे"

## आदिवासी समाजाला अतिरिक्त आरक्षण ? मुख्यमंत्र्यांना पाठवणार प्रस्ताव

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------------




राज्यात काही जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाजाची संख्या जास्त आहे. आदिवासी समाजातील तरुणांना नोकऱ्यांमध्ये वाढीव आरक्षण देण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीत अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शिक्षण मंत्री दादा भुसे आदिवासी मंत्री अशोक उईके, इतर मागासवर्गिय आणि बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे उपस्थित होते. राज्यातील पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली आणि रायगड या जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाजाची संख्या जास्त आहे.या भागातील आदिवासींसाठी नोकऱ्यांमध्ये आरक्षण वाढवण्याची गरज आहे. यासाठी सध्या ही बैठक घेण्यात आली आणि याबाबत सोशल मीडियावर स्वतः बावनकुळे यांनी पोस्ट करत सांगितले आहे. तसंच याबाबत प्रस्ताव आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही पाठवण्यात आला आहे. ही दुसरी बैठक झाल्याचेही सांगण्यात येत आहे. आदिवासी समाजाला आरक्षण आणि इतर मागासवर्गीय, पारंपरिक आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्ग, यांचे आरक्षण काही प्रमाणात कमी करुन आदिवासी समाजाला ते आरक्षण देण्याचा प्रस्ताव आहे. या विषयावर चर्चा करण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलवण्यात आली होती. राज्य सरकार मंत्रिमंडळ समितीची दुसरी बैठक झाली.
आदिवासी समाजाला आरक्षण देताना एसईबीसी आणि ओबीसी यांचे आरक्षण कमी करु नये असे छगन भुजबळ यांनी सुचवले आहे. त्याच वेळी, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके आणि इतर मागास आणि बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनीही बैठकीत आपले विचार मांडले. सर्व सदस्यांच्या मतांचा विचार करून आता या विषयावरील प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर, जाहिरात प्रतिनिधी, गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

## राज ठाकरेंच्या हिंदी सक्तीविरोधातील मुंबईतील मोर्चाची तारीख बदलली! सोशल मीडियावर पोस्ट करत दिली माहिती

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------






इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला राज्यतील राजकीय क्षेत्रातून विरोध केला जात आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा केली. मात्र यावेळी त्यांनी सांगितलेल्या तारखेत बदल करण्यात आला आहे. राज ठाकरे यांनी ६ जुलै (रविवार) या दिवशी सकाळी हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे म्हटले होते. मात्र आता ही तारीख बदलून ५ जुलै (शनिवार) करण्यात आली आहे. राज ठाकरेंनी सोशल मीडियावर पोस्ट करत याबद्दल माहिती दिली आहे.

" आज सकाळी आपल्या मराठीसाठी, महाराष्ट्रासाठी आणि मराठी माणसासाठी येत्या ६ जुलैला मोर्च्याची घोषणा केली होती. त्यात थोडा बदल आहे, हा मोर्चा रविवार ६ जुलैच्या ऐवजी, ५ जुलै शनिवारी सकाळी १० वाजता असणार आहे. बाकी ठिकाण आणि इतर सर्व तपशील तसेच असणार आहेत," असे राज ठाकरे म्हणाले आहेत.

राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सरकारची भूमिका मांडण्यासाठी आज राज ठाकरे यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी आपल्याला सरकारची भूमिका मान्य नसल्याचे म्हटले होते. यावेळी ते म्हणाले होते की, "पहिलीपासून हिंदीसक्ती होऊ देणार नाही, त्याविरोधात येत्या ६ जुलैला गिरगाव चौपाटीवरून मोर्चा काढण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्या मोर्चात कोणताही झेंडा नसेल. तो संपूर्ण मोर्चा हा मराठी माणसाचा असेल. मराठी हाच अजेंडा असेल. त्या मोर्चाचं नेतृत्व मराठी माणूस करेल..." "महाराष्ट्राची संपूर्ण ताकद ६ जुलै रोजी सकाळी १० वाजता गिरगाव चौपाटीवर दिसेल. अशावेळी मला हेही बघायचं आहे, या मोर्चात कोण सामील होतंय आणि कोण येणार नाहीत, हे देखील मला बघायचं आहे.शिक्षणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञांशी आम्ही बोलणार आहोत. सर्व विद्यार्थी, पालकांना आम्ही मोर्चाला आमंत्रण देणार आहोत. सरकारला एकदा कळू दे, महाराष्ट्राच्या मनात काय आहेत ते... हिंदीविरोधी मोर्चात सर्वजण सहभागी होतील. आम्ही महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षांशी बोलणार आहोत. कोणताही वाद आणि भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे, हे तुम्हाला ६ जुलैला कळेल..."

महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे
राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदुत गौरव पुरस्कार
कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!




महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE
दैनिक वृत्तपत्र वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449

## नवीन शैक्षणिक वर्षात दप्तराच्या ओझ्यांचा वाद प्रारंभ

**शैलेश रौंदळ**
**नाशिक प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

---------------------------------

नव्या शैक्षणिक वर्षाचा प्रवेशोत्सव सोहळा दणक्यात पार पडला. नववर्षाच्या सुरूवातीला विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. प्रवेशोत्सवाचा सोहळ्याचा अंक पार पडल्यानंतर शैक्षणिक वर्तुळात आता दप्तराच्या ओझ्यावरुन वाद सुरु झाला आहे. वह्या, पुस्तकांच्या ओझ्यामुळे मुले दमून जात असून त्यांना आरोग्याच्या तक्रारी सुरू झाल्या आहेत.पहिलं पाऊल, बैलगाडीतून मिरवणूक, ढोल ताशांचा गजर, कुठे फटाक्यांची आतशबाजी, मिष्ठांनाचे जेवण असे बरेच उपक्रम घेत नव्या शैक्षणिक वर्षाची सुरूवात दिमाखदार झाली. विद्यार्थ्यांना पहिल्या दोन दिवसात पाठ्यपुस्तकांचे वितरणही झाले. मात्र त्यानंतर आता दप्तराच्या ओझ्याची चर्चा सुरु झाली आहे. तत्कालीन शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी परीक्षानिहाय वेगवेगळी पुस्तके ठरवली होती. त्यामुळे दप्तराचे ओझे कमी होईल, असे नियोजन होते. परंतु, त्यातही लिहिण्यासाठी कोरी पाने ठेवण्यात आल्याने पुस्तकांचे वजन किती कमी झाले, हा प्रश्न होता. यंदा मोफत पाठ्यपुस्तकांमध्ये विद्यार्थ्यांना एका विषयाचे एक पुस्तक दिले गेले. पुस्तक आणि एक वही, गृहपाठ वही या सर्वांचे वजन विद्यार्थ्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त होत आहे. विद्यार्थ्यांवर होणाऱ्या प्रयोगामुळे शैक्षणिक वर्तुळात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. याविषयी नाशिक जिल्हा प्राथमिक विभाग मुख्याध्यापक संघटनेचे पदाधिकारी तसेच उन्नती प्राथमिक विद्यालयाचे मुख्यध्यापक नंदलाल धांडे यांनी माहिती दिली. शिक्षण विभागाकडून वितरीत करण्यात आलेल्या पुस्तकांमध्ये प्रत्येक विषयाचे एकच पुस्तक आहे. काही ठिकाणी मागील वर्षाच्या तुलनेत ते कमी असेल पण ते पुस्तक आणि वही वर्षभर विद्यार्थ्यांना बरोबर ठेवावी लागणार आहे. यामध्ये जास्त पानांची पुस्तके विद्यार्थ्यांकडून हाताळतांना खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुस्तकांचे वजन साधारणत: २०० ते ८०० ग्रॅम सरासरी वाढले आहे. पहिली आणि दुसरीसाठी दोन सत्रात दोन पुस्तके ठेवली असती तर मुलांना हाताळणे सोपे झाले असते, असे मत धांडे यांनी मांडले. इयत्ता पहिली ते आठवीसाठी प्रत्येक विषयाचे स्वतंत्र पुस्तक दिल्यामुळे दप्तराचे ओझे कमी करण्याच्या निर्णयाला तडा गेला आहे. शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांवर वेळोवेळी प्रयोग केले आहेत. स्वतंत्र पुस्तके काढून पुन्हा विद्यार्थ्यांना दप्तराचे ओझे नेण्यास भाग पाडले आहे. यापूर्वी द्विभाषिक पुस्तके तीन खंडामध्ये एका इयत्तेसाठी काढण्यात आलेले होते. त्यानंतर चार चार भागात पुस्तके विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांचा दप्तराचे ओझे काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली होती. परंतु, आता शिक्षण विभागाने पुन्हा सर्व विषयांची स्वतंत्र पुस्तके दिल्यामुळे दप्तराचे ओझे खूप वाढले असून विद्यार्थी आणि पालकांनी नाराजी व्यक्त केली आहे. पालकांच्या मते एकात्मिक द्विभाषिक पुस्तके विद्यार्थ्यांसाठी योग्य होती. तीन भागांमध्ये पुस्तकात संपूर्ण इयत्तेचा भाग समाविष्ट असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे बऱ्याच प्रमाणात कमी झाले होते. त्यानंतर चार भाग केले. तेही थोडे बरे होते. शिक्षण विभागाने पुन्हा एकात्मिक द्विभाषिक पुस्तके छपाई करून विद्यार्थ्यांना वितरित करावी, अशी मागणी पालकांकडून होत असल्याचे ग्रंथालय शिक्षक परिषदेचे अध्यक्ष विलास सोनार यांनी सांगितले.दप्तरांचे ओझे वाढल्याने विद्यार्थ्यांना पाठदुखी, खांदेदुखीचा त्रास होत आहे. यामुळे काही विद्यार्थ्यांकडून शाळेत जाण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर एकात्मिक द्विभाषिक पुस्तकांची यापुढे छपाई करावी, अशी मागणी होत आहे.

संपादकीय

# शुभांशूची तिरंगा घेऊन अंतराळात भरारी

आपल्या कुटुंबातील वडील, मुलगा किंवा पती घर सोडून दुसऱ्या शहरात राहायला जातो, तेव्हा कुटुंबातील सदस्यांच्या भावनिकतेला पारावार राहत नाही. त्याचप्रमाणे देशाचा सुपूत्र शुभांशू शुक्ला संशोधनासाठी अंतराळात रवाना झाला. त्याच्या कुटुंबांना जितका अभिमान आहे, तितकाच तो भारतीय असल्याचा गर्व समस्त देशवासीयांना आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्रात आज हा एक ऐतिहासिक क्षण मानला जातो. देशभर शुभांशूवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे अंतराळात गेलेले भारताचे दुसरे अंतराळवीर आहेत. अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी त्यांच्या तीन सहकाऱ्यांबरोबर मिळून 'ऑक्सिऑम-४' या अंतराळ मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने बुधवारी दुपारी उड्डाण केले. 'ऑक्सिओम-४' चे हे अंतराळातील चौथे खासगी अभियान आहे. हे नासा आणि स्पेसएक्सचे संयुक्त अभियान आहे. या अंतराळ मोहिमेत चार देशांमधील ४ अंतराळवीरांचा समावेश आहे. भारत, अमेरिका, पोलंड, हंगेरी हे देश आहेत, जे अंतराळवीर या मोहिमेत समाविष्ट आहेत.

नासाच्या फॉल्कन-९ या रॉकेटद्वारे फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून त्यांनी अवकाशात झेप घेतली. ४१ वर्षांनंतर भारतीय व्यक्ती अंतराळात गेल्याचा वेगळा आनंद आहे. याआधी ३ एप्रिल १९८४ रोजी भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा हे सोव्हिएत संघाच्या मदतीने अवकाश मोहिमेवर गेले होते. आता वायुदलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला अंतराळ मोहिमेवर गेले आहेत. एक वर्षाचे प्रशिक्षण व कठोर मेहनतीनंतर शुक्ला यांची नासाने या मोहिमेसाठी निवड केली आहे. या मोहिमेत अंतराळातील पिकांच्या उगवणीसाठी महत्त्वाचं संशोधन करण्यात येणार आहे. त्यामुळे भारत केंद्रित अंतराळ शेती आणि भविष्यातील अंतराळ संशोधनाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे. या मोहिमेसाठी ५४८ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात जाणाऱ्या शुभांशू शुक्ला यांना लढाऊ विमान उडवण्याचा अनुभव आहे. या मिशनमध्ये ते मिशन कमांडर असणार आहेत. चाळीस वर्षीय शुभांशू यांचा जन्म लखनऊमध्ये झाला. जून २००६ मध्ये ते भारतीय हवाईदलात दाखल झाले. मार्च २०२४ मध्ये ते ग्रुप कॅप्टन बनले. एक दुर्मीळ योगायोग असा की, राकेश शर्मा यांच्या मोहिमेला ४१ वर्षे झाली आहेत; परंतु ४० वर्षांचे शुभांशू हे राकेश शर्मांनंतर अंतराळात जाणारे दुसरे भारतीय ठरले आहेत. शुभांशू शुक्ला यांनी सु-३०, मिग-२१, मिग-२९, जगुआर, हॉक, डोर्नियर आणि एएन-३२ सह विविध विमानांवर २ हजारांपेक्षा अधिक तास उड्डाण केले आहे. २०१९ मध्ये त्यांनी रशियाच्या गगारिन कॉस्मोनॉट ट्रेनिंग सेंटरमध्ये अंतराळ यात्री म्हणून प्रशिक्षण घेतले. त्यानंतर भारताच्या गगनयान मिशनसाठी त्यांची इस्रोकडून निवड झाली होती.

मोदी-बायडेन करारातून जन्मलेली मोहीम आहे. या मोहिमेची घोषणा जून २०२३ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिकेतील दौऱ्यात झाली होती. यामध्ये इस्रो आणि नासा यांच्यातील सहकार्याने भारतीय अंतराळवीराला अंतराळात पाठवण्याचा निर्णय झाला होता. या अंतराळ मोहिमेसाठी भारताने एक जागा मिळवण्यासाठी ५५० कोटी रुपये ॲक्सिअम स्पेसला दिले आहेत. हे भारताच्या जागतिक अंतराळ सहकार्याचे प्रतीक आहे. ही मोहीम "मिशन आकाशगंगा" या नावाने ओळखली जाते. यापूर्वी ॲक्सिओम-४ मोहिमेचे प्रक्षेपण अनेक कारणांमुळे पुढे ढकलण्यात आले होते. पूर्वी निश्चित वेळापत्रकाबद्दल बोलायचे झाले तर ते २९ मे रोजी प्रक्षेपित होणार होते. तथापि, त्यावेळी ते पुढे ढकलण्यात आले आणि नंतर ते ८ जून, १० जून आणि ११ जून रोजी पुढे ढकलावे लागले. अखेर, दीर्घ प्रतीक्षेनंतर, ते २५ जून रोजी प्रक्षेपित करण्यात आले. दोन आठवड्यांच्या या मोहिमेचे नेतृत्व माजी अंतराळवीर पेगी व्हिटसन करत आहेत. या मोहिमेत एकूण ६० वैज्ञानिक प्रयोग करण्यात येणार असून, त्यापैकी ७ प्रयोग भारतातील संशोधकांनी सुचवले आहेत. ज्यात मूग आणि मेथीची लागवड करण्याचा समावेश आहे. पृथ्वीवर करोडो लोकांना त्रस्त करणाऱ्या डायबेटिस अर्थात, मधुमेहावरील उपचारात क्रांती घडवण्यासाठी आता अंतराळाची मदत घेतली जात आहे. ॲक्सिअम-४ मोहिमेतील अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अत्यल्प गुरुत्वाकर्षणाच्या स्थितीत इन्सुलिनवर अभ्यास करणार आहेत. या संशोधनामुळे मधुमेहींसाठी अधिक प्रभावी आणि स्थिर इन्सुलिन तयार करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. पृथ्वीवर इन्सुलिनचे रेणू एकत्र येऊन गुठळ्या तयार होतात, ज्यामुळे त्याची परिणामकारकता कमी होते. इन्सुलिन पंपांसारख्या उपकरणांमध्ये यामुळे अडथळे निर्माण होतात. मात्र, अंतराळातील मायक्रोग्रॅव्हिटीच्या वातावरणात ही प्रक्रिया अत्यंत मंदावते. यामुळे शास्त्रज्ञांना इन्सुलिनच्या रेणूंची गुठळी तयार होण्याच्या प्रक्रियेचे अधिक सखोल विश्लेषण करण्याची संधी मिळणार आहे. या मोहिमेतील अंतराळवीर या प्रक्रियेचा अभ्यास करून असा डेटा गोळा केला जाईल. ज्याच्या मदतीने पृथ्वीवर अधिक स्थिर आणि जास्त काळ टिकणारे इन्सुलिन विकसित करता येईल, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. हे संशोधन यशस्वी झाल्यास, ते केवळ इन्सुलिनची परिणामकारकता वाढवणार नाही, तर मधुमेहावरील उपचारांचा खर्च कमी करण्यासही मदत होणार आहे.

"माझ्याबरोबर, माझ्या खांद्यावर आपला तिरंगा आहे. हा तिरंगा मला सांगतोय की, मी या प्रवासात एकटा नाही. मी तुम्हा सर्वांबरोबर इथे आहे", ही शुभांशू शुक्लाची इन्स्टाग्रामवरची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत असून, शुभांशूच्या देशप्रेमाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे

# शिक्षक नसल्याने शाळा बंद करण्याचा अल्टिमेटम! पालकांचा स्फोटक इशारा, गोरेगाव तालुका धगधगतो

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत



गोरेगाव पंचायत समिती अंतर्गत पुरगाव केंद्रातील गणखैरा जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक टंचाईने अखेर संतापाचा स्फोट झाला आहे! तब्बल ११३ विद्यार्थ्यांवर फक्त २ शिक्षक, त्यापैकी एक नुकतेच सेवानिवृत्त – आणि अजूनही प्रशासन झोपेत? "७ दिवसांत शिक्षक नाहीत, तर शाळा बंद करू!" – पालकांचा थेट इशारा शाळेसाठी ५ मंजूर पदांपैकी फक्त १ शिक्षक कार्यरत असून त्याच्यावर इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचा संपूर्ण भार आहे. ही स्थिती विद्यार्थ्यांच्या भविष्यावर सरळ सरळ घाला आहे. या अन्यायाच्या विरोधात पालकांचा संयम सुटला असून, त्यांनी ७ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे – शिक्षक द्या अन्यथा शाळेचे गेट कुलूपबंद! निवेदनाद्वारे संतप्त पालकांचा आवाज प्रशासनाच्या कानावर या भीषण परिस्थितीच्या निषेधार्थ पालकांनी गटशिक्षणाधिकारी व पंचायत समिती गोरेगाव यांना तीव्र निवेदन सादर केले. या वेळी पुढील मान्यवर उपस्थित होते: पंचायत समिती सभापती चित्ररेखा चौधरी , सामाजिक कार्यकर्ते नामदेव नाईक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश राऊत, सदस्य ठाणसिंग राहांगडाले, कांतिलाल भोंडे, विष्णू हरिणखेडे, राजेश पटले मोठ्या संख्येने संतप्त पालक " शासन झोपले, पण आम्ही नाही!" – पालकांचा संतप्त इशारा शाळा व्यवस्थापन समितीच्या विशेष बैठकीत हा मुद्दा धगधगत्या शब्दात मांडण्यात आला. पालकांच्या मते शासनाच्या दुर्लक्षामुळे त्यांचे मुलं शिक्षणापासून वंचित राहत आहेत. > "शासनाने शिक्षण विभाग झोपेत ठेवला आहे का? शिक्षक मिळाले नाहीत तर आम्ही मुलांना खासगी शाळेत टाकणार – आणि सरकारी शिक्षण व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभं करू!" – पालकांची तीव्र प्रतिक्रिया. ७७ शिक्षकांची कमतरता – गोरेगाव तालुक्याची विदारक अवस्था संपूर्ण गोरेगाव तालुक्यात सध्या ७७ शिक्षकांची भीषण कमतरता असून अनेक जिल्हा परिषद शाळा अक्षरशः शिक्षकविरहित आहेत. विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात आलं असून, शिक्षण हक्क अधांतरी झाला आहे.

लवकरच उग्र आंदोलनाची शक्यता – प्रशासनावर दबाव गावात प्रचंड अस्वस्थता पसरली आहे. शासनाने शिक्षकांची नियुक्ती तात्काळ केली नाही तर मोठ्या आंदोलनाचा उद्रेक अटळ मानला जात आहे. पालक, ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी रस्त्यावर उतरून लढा उभारण्याची तयारी सुरू केली आहे. "शिक्षण ही मुलभूत गरज आहे. मुलांना अंधारात ढकलण्याचा अधिकार कोणालाही नाही. शिक्षक द्या अन्यथा आम्ही शांत बसणार नाही!" पालकांचा प्रशासनाला जळजळीत इशारा!

# छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती 'सामाजिक न्याय दिन' म्हणून उत्साहात साजरी

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत








अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालयात गुरुवार दिनांक २६/०६/२०२५ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली . विद्यालयात विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्याबद्दल आपल्या भाषणातून माहिती सांगितली. ज्योती गुजर मॅडम या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या त्यांनी विद्यार्थ्यांना राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या बद्दल मोलाचे मार्गदर्शन केले .कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. बाळासाहेब पाटील, सचिव संदिप पाटील संस्थेचे प्रशासन अधिकारी श्री.राजेंद्र सोनवणे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.कविता देवकर मॅडम उपस्थित होत्या. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.कुमुद मोरे सर, श्री.लकेश देसले सर , सौ. मनीषा पाटील मॅडम, सौ. प्रतिभा दिवे मॅडम, श्री. सुनील पाटील, श्री.भाऊसाहेब भामरे यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती चांदणी पगारे मॅडम यांनी केले.

# माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती 'सामाजिक न्याय दिन' म्हणून उत्साहात साजरी

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत





अंबिका मित्र मंडळ संचलित माध्यमिक विद्यालयात, सिडको वसाहत दौलतनगर सिडको नाशिक. विद्यालयात, दिनांक २६/०६/२०२५ वार : गुरुवार रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली . विद्यालयात विद्यार्थ्यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्याबद्दल आपल्या भाषणातून माहिती सांगितली. श्रीमती.वैशाली खैरनार मॅडम या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या त्यांनी विद्यार्थ्यांना राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या बद्दल मोलाचे मार्गदर्शन केले .कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. बाळासाहेब पाटील, सचिव संदिप पाटील संस्थेचे प्रशासन अधिकारी श्री.राजेंद्र सोनवणे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्री.सतिश भालेराव उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती.निता पाटील श्री.वसंत राठोड सर, श्री.केशव जगताप सर , श्री.तुषार तुपे, श्री.सूरज सोनवणे,श्री. रवी पाटील, यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.केशव जगताप सर यांनी केले.

# अ.भा.मराठी पत्रकार परिषदेचा पुरस्कार वितरण सोहळा २ जुलै रोजी मुंबईत ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना जीवनगौरव पुरस्कारने सन्मानित करणार मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांचे उपस्थितीचे आवाहन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



अखिल भारतीय मराठी परिषदेच्यावतीने देण्यात येणारया विविध पुरस्कारांचे वितरण २ जुलै २०२५ रोजी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती एस.एम.देशमुख आणि परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.. ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे..पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना अ. भा. मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने विविध पुरस्कार देऊन दरवर्षी गौरविण्यात येते.. यावर्षी देखील १० पत्रकारांचा मा. शरद पवार आणि मा. डॉ. नरेंद्र जाधव यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.. जवळपास ६५ वर्षे निष्ठेने पत्रकारिता करणारे ज्येष्ठ संपादक मधुकर भावे यांना "बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव" पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे.. २५ हजार रुपये रोख, स्मृतीचिन्ह, मानपत्र, शाल श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.. यापुर्वी हा पुरस्कार दिनू रणदिवे, मा. गो. वैद्य, पंढरीनाथ सावंत, प्रकाश जोशी आदि मान्यवरांना देण्यात आला आहे..

अन्य पुरस्कार आणि पुरस्कार्थी पुढील प्रमाणे - परिषदेचे माजी अध्यक्ष आचार्य अत्रे स्मृती पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे यांना इलेक्ट्रॉनिक मिडियासाठीचा शशिकांत सांडभोर पुरस्कार मुंबई तक चे अभिजित करांडे यांना, स्व. पत्रकार प्रमोद भागवत स्मृती पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार अमेय तिरोडकर यांना, भगवंतराव इंगळे स्मृती पुरस्कार अंमळनेर येथील ज्येष्ठ पत्रकार पांडुरंग पाटील यांना, नागोजीराव दुधगावकर पुरस्कार बीड येथील सुराज्य दैनिकाचे संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांना, दत्ताजीराव तटकरे स्मृती पुरस्कार दैनिक हेराल्डचे संपादक दिनेश केळुसकर यांना, महिला पत्रकारांसाठी असलेला सावित्रीबाई फुले पत्रकारिता पुरस्कार सिंधुदुर्ग येथील पत्रकार सीमा मराठे यांना, कृषी क्षेत्रातील पत्रकारांसाठी यावर्षी पासून सुरू करण्यात आलेला स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख कृषी पत्रकारिता पुरस्कार अँग्रोवनचे पत्रकार बाळासाहेब पाटील यांना , मराठी पत्रकार परिषदेच्या प्रसिध्दीचे काम उल्लेखनीय करणाऱ्या राज्यातील प्रसिद्धी प्रतिनिधींना दिला जाणारा संतोष पवार स्मृती पुरस्कार यंदा पुणे येथील पत्रकार भरत निगडे यांना देण्यात येणार आहे.. दीर्घकाळ रंगभूमीची सेवा करणारे ज्येष्ठ नाट्यकर्मी, कलाकार भरत जाधव यांचा विशेष गौरव करण्यात येणार आहे..२ जुलै २०२५ रोजी मुंबई मराठी पत्रकार संघ, आझाद मैदान मुंबई येथे दुपारी ४ वाजता पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होत आहे..पुरस्कार वितरण सोहळयास सर्वांनी उपस्थित राहण्याचं आवाहन एस.एम.देशमुख, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, महिला आघाडी राज्याध्यक्ष शोभा जयपूरकर, मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके, मुंबई शाखा अध्यक्ष राजा आदाटे यांनी दिली आहे.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# नाशिकमध्ये पोस्टरवॉर ! सीमा हिरे-बडगुजर समर्थकांमध्ये उघड रस्त्यावर संघर्ष

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



शिवसेना उद्धव ठाकरे पक्षातून बडतर्फ केलेले सुधाकर बडगुजर यांचा भाजप प्रवेश सुरुवातीपासून वादाचा विषय ठरला होता. आता आमदार सीमा हिरे आणि सुधाकर बडगुजर यांच्या समर्थकांत या वादाने नवे वळण घेतले आहे. शुभेच्छा देण्यावरून थेट पोस्टरवॉर रंगल्याने भाजप समर्थकांत दरी निर्माण झाली आहे. नाशिकच्या सिडको परिसरात एकीकडे महापालिका निवडणुकीची चाहूल लागलेली असताना, दुसरीकडे सत्ताधारी भाजपमध्येच अंतर्गत संघर्षाचे वादळ उफाळून आले आहे. आमदार सीमा हिरे आणि अलीकडेच भाजपमध्ये प्रवेश केलेले नेते सुधाकर बडगुजर यांच्यातील राजकीय वाघयुद्ध आता उघडपणे रस्त्यावर उतरल्याचे स्पष्ट चित्र समोर आले आहे. त्रिमूर्ती चौकात झळकलेले दोन बॅनर सध्या सिडको परिसरात प्रचंड चर्चेचा विषय बनले आहेत. एकीकडे बडगुजर हे हात जोडून शांत, विनम्र मुद्रा स्वीकारताना दिसतात, तर दुसरीकडे आमदार सीमा हिरे अंगुलीनिर्देशन करत रोष व्यक्त करताना झळकतात. ही केवळ पोस्टरबाजी नसून, ही भाजपच्या अंतर्गत फुटीची सुरुवात आहे, असा आरोप विरोधकांकडूनही केला जात आहे. या बॅनरमधून कोणाला इशारा दिला जातोय? बडगुजर यांना पक्षात घेतले तरी खरोखर सर्वजण त्यांचे स्वागत करत आहेत का? की त्यांच्या आगमनानेच पक्षातील जुन्या नेत्या हिरे यांच्या नेतृत्वाला सुरुंग लागतोय? हे प्रश्न आता उघडपणे विचारले जाऊ लागले आहेत. राजकीय निरीक्षकांचे म्हणणे आहे की, ही केवळ बॅनरबाजी नाही, तर भाजपच्या सत्ताकारणातील अंतर्गत संघर्षाचे दृश्य स्वरूप आहे. सीमा हिरे यांचा आक्रमक बॅनर म्हणजे 'हे क्षेत्र माझे आहे' असा संदेश आहे, तर बडगुजर यांचा हात जोडलेला बॅनर म्हणजे 'मी आलोय, पण संघर्ष नको' असा एक रणनीतिक भाव.

पक्षांतर्गत नेते, कार्यकर्ते आणि नागरिक यांच्यातही एक वेगळीच कुजबुज सुरू झाली आहे

"हे केवळ बॅनर आहेत की पुढील बंडाची सुरुवात?"

"सत्ता टिकवण्यासाठी आपल्याच लोकांवर कुरघोडी केली जाते का?"

राजकीय मतभेदाचे हे दृश्य रस्त्यावर उतरू लागल्याने सिडको परिसरात राजकीय तापमान चांगलेच वाढले आहे. ही फक्त सुरुवात आहे, असे बोलले जात असून, पक्षश्रेष्ठी याकडे दुर्लक्ष करणार की कारवाई करणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या सिडकोत आता संघर्षाचे ढग गडद होत चालले आहेत. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्येच अंतर्गत वाद टोकाला पोहोचला आहे. त्याचा निवडणुकीवर काय परिणाम होतो याची सगळयांना उत्सुकता आहे.

# ताहाराबाद विद्यालयात राजश्री शाहू महाराज जयंती साजरी

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------




ताहाराबाद येथील मविप्र संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज, ताहाराबाद विद्यालयात राजश्री शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य दिपक डावरे हे होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य दिपक डावरे व पर्यवेक्षक बी. एस.जगताप यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डावरे यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा आदर्श प्रत्येकाने घ्यावा असे सांगितले. त्यानंतर विद्यार्थी भाषणांमधून दिव्या नंदन, जानवी शिरसाठ, हर्षल गवळी आदि विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक भाषणांमधून राहुल पगार यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याची माहिती दिली.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक जितेंद्र बच्छाव यांनी तसेच आभार उपशिक्षक सुजित देवरे यांनी मानले. तसेच माध्यमिक विभागाचे उपशिक्षक एस. के. निकम, जे. एल. गावित, के. जी. अहिरे, के. एम. मोरे, के. ए. बागुल, एस. बी. सोनवणे, श्रीमती पी.पी. माटे, जे.पी. बच्छाव, के.बी. चव्हाण, आर. जी.संसारे, श्रीमती एस. बी. रौंदळ, एस. आर. दळवी, श्रीमती डी. आर. गावित, एस.जी. गिरी, एस. ए. पवार, एस. यू. भामरे,एस. पी. देवरे, आर. डी. पगार, श्रीमती एस. व्ही. सूर्यवंशी, डी. एल. कापडणीस, जयदीप मोरे, डी. व्ही. सोनवणे, एल. यु. साळवे, वाय. व्ही. पवार तसेच सुनील देवरे, सखाराम अहिरे, निलेश माळी, कुणाल देवरे, धनंजय वणीस, मंगेश पगारे, प्रवीण रौदळ मामा उपस्थित होते.

# धुळ्यातील योगशिक्षक मनिषा चौधरी, दीपश्री कुलकर्णी व जयंत विभाडिक यांना 'योग रत्न पुरस्कार २०२५' प्रदान

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------





आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श्री अजितदादा पवार गट) डॉक्टर सेल आयुष विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे येथील तीन प्रतिष्ठित योगशिक्षकांना 'योग रत्न पुरस्कार २०२५' बहाल करण्यात आला. योग क्षेत्रात दिलेल्या भरीव योगदानाबद्दल हा सन्मान त्यांना प्रदान करण्यात आला.

पुरस्कारार्थींमध्ये सौ. मनीषा राजेंद्र चौधरी, सौ. दीपश्री दत्तात्रय कुलकर्णी आणि श्री. जयंत यशवंत विभांडिक यांचा समावेश आहे.

सौ. मनीषा राजेंद्र चौधरी, ज्या धुळे शहर योगशिक्षिका आणि धुळे जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र उद्योग शिक्षक संघ आहेत, गेल्या २० वर्षांपासून योगाच्या माध्यमातून समाजाची सेवा करत आहेत. त्यांनी शाळा, महाविद्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि शासकीय कार्यालयांमध्ये योग वर्ग घेऊन अनेकांना मार्गदर्शन केले आहे. सौ. दीपश्री दत्तात्रय कुलकर्णी, धुळे जिल्हा उपाध्यक्ष, महाराष्ट्र उद्योग शिक्षक संघ, या गेल्या १० वर्षांपासून धुळे, जळगाव आणि भुसावळ येथे योग वर्गांचे आयोजन करून योग प्रचारासोबतच समाजसेवा करत आहेत. श्री. जयंत यशवंत विभांडिक, महासचिव, महाराष्ट्र योग शिक्षक संघ, धुळे,गेल्या २२ वर्षांपासून योग आणि निसर्गोपचाराचे मार्गदर्शन व उपचार देऊन समाजाची सेवा करत आहेत. या तिन्ही योगशिक्षकांच्या योग क्षेत्रातील अमूल्य कार्याचा उचित सन्मान आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श्री अजितदादा पवार गट) डॉक्टर सेल आयुष विभाग यांच्या वतीने करण्यात आला. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल धुळे जिल्हा योगशिक्षक संघ साक्री शिरपूर शिंदखेडा तालुका योग शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या अभिनंदन केले आहे

# महामित्र परिवार व आद्य क्रांतिकारक राघोजी ब्रिगेड यांच्या वतीने आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराज यांच्या जयंती निमीत्त अभिवादन

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------



आरक्षण प्रथा सर्वात प्रथम राबविणारे राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महामित्र दत्ता वायचळे म्हणाले की ,छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले यांच्या विचारांचा व कार्याचा वारसा चालवणारे राजे म्हणजे राजश्री शाहू महाराज ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते.शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी इ.स. १९१९ साली सवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळया शाळा भरवण्याची पद्धत बंद केली.असे म्हणाले जगन्नाथ कटारनवरे म्हणाले की* जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. इ.स. १९१७ साली त्यांनी पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली.असे म्हणाले डॉ. .विजय लोहारकर म्हणाले की* त्यांनी शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी वेगवेगळ्या संस्था निर्माण केल्या.त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी व मूकनायक वृत्तपत्रासाठी सहकार्य केले होते. तसेच, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्त्वे राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अमलात आणली. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे.असे म्हणाले. का◌ॅम्रेड *हरिभाऊ तांबे म्हणाले की*

व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व तिची त्वरित अंमलबजावणी करुन संबंधत अधिकाऱ्याकडून अहवाल मागविले. शाहूंच्या या निर्णयाला तेंव्हा अनेक उच्चवर्णीय पुढाऱ्यांनी विरोध केला. त्या काळात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्या लोकांसाठी नोकरीमध्ये राखीव जागांची तरतूद करून सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. असे म्हणाले विजय मुठे म्हणाले की वेदोक्त मंत्र म्हणण्याच्या अधिकारावरून झालेला वेदोक्त संघर्ष राजर्षी शाहूंच्याच काळात झाला. हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील वादळच होते. या प्रकरणामुळे सत्यशोधक चळवळ आणखी प्रेरित झाली. बहुजन, अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचे कार्य करताना त्यांनी एका अर्थाने महात्मा फुले यांचीच परंपरा पुढे चालवली. त्यांनी सत्यशोधक चळवळीला प्रत्यक्ष सहकार्य केले. अशा महान राजास विनम्र अभिवादन !

ओबीसींचे मसीहा, सामाजिक न्यायाचे शिल्पकार आणि *भारताचे माजी पंतप्रधान स्व. विश्वनाथ प्रताप सिंह* तथा व्ही. पी. सिंह त्या काळात होत असलेला प्रचंड विरोध पत्करून आणि स्वतःची राजकीय कारकीर्द पणाला लावून देशातील सामाजिक समतेचा नवा अध्याय लिहिणारे स्व. व्ही. पी. सिंह यांचं हे कार्य वंचित, बहुजन, अठरापगड समाजासाठी अतिशय मोलाचे असे योगदान आहे.तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'भारतरत्न' देण्याचा निर्णय घेऊन भारताच्या इतिहासात गौरवशाली पान जोडण्याचे महत्त्वाचे काम देखील त्यांनी केले. त्यांच्या या कार्याबद्दल या देशातील समस्त बहुजन समाज कृतज्ञ आहे. त्यांना जयंतीनिमित्त कृतज्ञ अभिवादन! या कार्यक्रमाचे *सुत्रसंचलन प्रकाश माळी प्रास्ताविक*विजय मुठे तर आभार श्रीकांत जाधव* यांनी मानले. या प्रसंगी महामित्र दत्ता वायचळे,डा◌ॅ.विजय लोहारकर, का◌ॅम्रेड हरिभाऊ तांबे, सहसंस्थापक विजय मुठे, जगन्नाथ कटारनवरे माजी नगरसेवक श्रीकांत जाधव, शिवाजी कानडी धम्मानंद डोंगर दिवे, गणपत काळे, प्रकाश माळी राजेंद्र देशमुख,भगवान पाचोरे,मनोज माळी आदि उपस्थित होते.

# "वैश्विक तापमानवाढीपासून वाचायचं असेल तर आदिवासी संस्कृती वाचवा!" – विलास भोगारे यांचा धगधगता इशारा!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------






" आदिवासी वाचले तरच पर्यावरण वाचेल!" – या एका झणझणीत वाक्यात राष्ट्रीय प्रस्तुतकर्ता आणि संशोधक मार्गदर्शक विलासदादा भोगारे यांनी पर्यावरणीय संकट आणि आदिवासी अस्तित्व यामधील अतूट नातं सर्वांसमोर ठणकावून मांडलं! सिटी बिंझानी कॉलेज, नागपूर येथे 'भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद' अंतर्गत आयोजित 'LEGACY OF BIRSA MUNDA: Indigenous Rights, Environmental Justice & Sustainable Development' या दोन दिवसीय राष्ट्रीय सेमिनारमध्ये त्यांनी चौथ्या सत्रात मार्गदर्शन करताना एकच खळबळ उडवून दिली!

भोगारे यांच्या भाषणातील ठळक मुद्दे:

स्वातंत्र्यलढ्यातील आदिवासींचा इतिहास – इतिहासातून पुसला गेलेला, पण महत्त्वपूर्ण! FRA-२००६, व्याघ्र प्रकल्प, हत्ती प्रकल्पांतून आदिवासींचं बळजबरीने विस्थापन वन्यजीव आणि वनसंवर्धन कायद्यातील आदिवासीविरोधी कलमे आदिवासी जीवनशैलीतील पर्यावरणपूरक वैज्ञानिक दृष्टिकोन "जिथे आदिवासी – तिथे जिवंत जंगलं!" भोगारे यांनी स्पष्ट सांगितलं की, "राजस्थानसारख्या कोरड्या भागातही जिथे आदिवासी राहतात, तिथे हिरवळ टिकून आहे – कारण निसर्ग त्यांचा देव आहे, जंगल त्यांचं घर आहे!" त्यांनी उदाहरण दिलं की आदिवासींच्या नैसर्गिक स्नेहभावामुळेच जंगल आजपर्यंत वाचले – पण विकासाच्या नावाखाली त्यांचं अस्तित्वच नष्ट केलं जात आहे!

थेट आणि स्फोटक इशारा:

"तापमानवाढीनं पृथ्वी सुळसुळतेय... जर आदिवासींना वाचवलं नाही, तर आपणही वाचणार नाही! ही लढाई केवळ हक्कांची नाही, तर माणसाच्या अस्तित्वाची आहे!"

संपादकीय टीप

भोगारे यांचं वक्तव्य म्हणजे फक्त आदिवासी समाजासाठी नाही, तर संपूर्ण मानवजातीला दिलेला 'निसर्ग वाचवा'चा बुलंद इशारा आहे.

ग्लोबल वॉर्मिंग, पर्यावरणीय रक्षण यावर चर्चा करणाऱ्यांनी आता भाषण थांबवून आदिवासी जीवनशैलीकडं पाहावं – कारण त्यांच्याच हातात निसर्गाचं खरं रक्षण आहे!

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# कलम ३५२ चा वापर करून लावलेली आणि ही भारतीय लोकशाहीतील काळेपर्व - श्री वसंतराव बच्छाव

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------



दहिवेल येथील उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय तसेच दादासाहेब माणिकराव पाटील कनिष्ठ महाविद्यालयात आणीबाणीला ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आणीबाणी हा भारतीय इतिहासातील काळा दिवस का मानला जातो या संदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी नवोदय शैक्षणिक संस्थेचे संचालक व भारतीय जनता पार्टी शैक्षणिक संस्था प्रकोष्टचे सहसंयोजक वसंतराव बच्छाव , भारतीय जनता पार्टीचे धुळे जिल्हा चिटणीस प्रमोद गांगुर्डे, भारतीय जनता पार्टी पिंपळनेर चे अध्यक्ष डॉ राजेंद्र पगारे ,प्राचार्य डॉ एस सी अहिरे उपस्थित होते. २५ जून १९७५ रोजी स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी जी आणीबाणी लावली होती तिला आज पन्नास वर्षे पूर्ण होत असून आणीबाणी नेमकी का लावली व आणीबाणी लावल्यानंतर देशांमध्ये ची दडपशाही सुरू झाले त्यामध्ये न्यायव्यवस्था, पोलीस प्रशासन व इतर सर्व प्रशासनिक कार्यालयांवरती एक अधिकार शाही गाजवून भारतीय जनतेचे लोकशाहीने दिलेले मूलभूत अधिकार याचे हनन करत प्रचंड दडपशाही करून अनेक निर्णय घेण्यात आले. त्या विरोधात विरोधी पक्ष नेत्यांनी आंदोलने केली असता त्यांना सरसकट जेलमध्ये डांबण्यात आले तेथे त्यांच्यावर अनन्वित अत्याचार करण्यात आले आणि अशा पद्धतीने लोकशाहीची हत्या करून देश आपल्या हातात घेण्याचं काम स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी तात्कालीन राष्ट्रपतींना हाताशी धरून केले असे वसंतराव बच्छाव यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले .यावेळी प्रमोद गांगुर्डे यांनीही भारतीय संविधानातील कलमाचा गैरवापर करून ज्या पद्धतीने आणीबाणी लावली त्या विरोधात लढणाऱ्या देशभक्त लोकांचे अतोनात हाल करण्यात आले असे सांगत सुदृढ लोकशाहीसाठी आणीबाणी हा पर्याय नसून तो वापरणे गैर असल्याचे सांगितले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ सुनील संधानशिव यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा शिवप्रसाद शेवाळे यांनी केले आभार प्रा डॉसंजय गवळी यांनी मानले

# विचारपुष्प

ह्या व्यावहारिक जगात तुझे कोणं होते. ? मागे तुझ्याकडे काय होते. ? जेव्हा सर्व होते, तेव्हा उपभोग घेतलाच नाही. देवधर्म केला नाही, की कुना दुःखिताच्या झोळीत दाणं टाकावं अस कधी वाटलंच नाही. हातातून सारं निसटले, तुझ्याकडे काहीच शिल्लक नव्हतं तीथे सुख भोगण्याचा प्रश्नच आला नाही. आयुष्यभर राब राब राबला, ढेकळात खपला , बाह्य भौतिक सुख कधी तुझ्या नशिबी आलेच नाही. ज्यांच्यासाठी आयुष्यभर संसाररूपी जत्रेत फिरला, त्यांची हौस पुरवली.स्वःता उघडा राहिला पणं कुणाला नागड ठेवले नाही. तु पोट खपाटी राहिला पणं त्यांना पोटभर जेऊ घालायचा. तु आयुष्यभर सर्वांची काळजी घेत राहिलास, पणं त्यांनी कधी तुझी काळजी केली का? त्यांच्या मागे पहाडा सारखा पुढे मागे फिरत राहीला, ते तुझ्या शेवटच्या कर्मसोहळ्याच्या यात्रेत तुझ्यामागे फिरलेत का? तुझी संसारअर्धांगी धर्मपत्नी घराच्या उंबऱ्या पर्यंत होती, पोटची पोरं अग्नीडाग देऊन निघून गेली,भावकी सगेसोयरे सरणावरच्या तुझ्या मढ्याला पाणी पाजून परत गेली, गावकी फुकाची भावपूर्ण श्रद्धांजली वाहून घराकडे वळलीत, सरणा वरच्या तुझ्या मढ्यावरं बांधलेला शिधा लोक पायदळी तुडवत गेले, तु इथे एकटाच जळतोय ! तरी मागच्यांची चिंता करतोय ! नातेगोते, सगेसोयरे, गावकी, भावकी, कुटूंब कबिला दहा दिवसांनी तुला विसरतील. आयुष्यभर उन, वारा, थंडी, पावसात कुडकुडत होता. भिजत होता उन्हाळ्यात अंगाची लाही लाही होत होती, तरी तु कुटूंबासाठी जळत होता. आजही गावाबाहेरच्या स्मशानात एकटाच जळत आहे. जन्माला एकटा रडत आला, मेल्यावर स्मशानात जळतांना एकटा आगीच्या भक्षस्थानी रडत आहे. संसारात राहून परमार्थ केला असता तर आज आनंदाने आत्मानंद परमानंदात विलीन झाला असता.

**लेखक :**
**साहेबराव नंदन तात्या नाशिक**

# घरकुल विभागात सीसीटीव्हीची नजर पैशाची मागणी केल्यास थेट तक्रार करा : मुख्यकार्यकारी अधिकारी मेघना कावली यांचे निर्देश

गोविंद ढगे
लोहा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी नुकत्याच पार पडलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पंचायत समिती कार्यालयातील घरकुल विभागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करत प्रकल्प संचालक संजय तुबाकले यांच्या मार्गदर्शनाखाली, लोहा पंचायत समिती कार्यालयातील घरकुल विभागाचे प्रमुख दिनेश तेलंग यांनी त्वरित सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे.

घरकुल लाभार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची पैशांची मागणी होऊ नये, यासाठी हा कठोर निर्णय घेण्यात आला आहे. लाभार्थ्यांना कोणत्याही कर्मचाऱ्याने पैसे मागितल्यास त्वरित गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार करावी, असे स्पष्ट निर्देश सीईओ मेघना कावली यांनी दिले आहेत.

तसेच, घरकुल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी लाभार्थ्यांना कोणताही आर्थिक मोबदला न घेता निस्वार्थ भावनेने सेवा द्यावी, असे स्पष्ट करत प्रशासनाने पारदर्शकतेला प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे घरकुल विभागात पारदर्शकता येण्यास मदत होणार असून, गरजूंना दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# साक्री शहरात शिवसेना भाजपचा पोलीस ठाण्यात रस्ता रोको आंदोलन

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------




साक्री नगरपंचायतीची सभा व निर्णयासाठी हा रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात लवकरात लवकर साक्री नगरपंचायतीची सभा झालीच पाहिजे अशी घोषणा करण्यात आली . हे आंदोलन पोलीस ठाण्याजवळ करण्यात आले आहे .२५ जून वार बुधवारसाक्रीनगरपंचायतीची विशेष सभा ही बोलवण्यात आली होती. ही सभा या साक्री नगरपंचायत चे नगरसेवक यांनी१८ जूनला धुळे जिल्हाधिकारी यांच्याकडे एक अपील केले होते . नगराध्यक्षा अविश्वास ठराव दाखल केला होता. त्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांनी लगेच निर्णय घेऊन आजची सभा२५ जून रोजी साक्री नगरपंचायत येथे पीठासीन अधिकारी तथा प्रांत अधिकारी रोहन कुवर यांच्या अध्यक्ष खाली आज सकाळी११:०० वाजता आयोजित केले होते . परंतु रोहन कुमार पिठासीनाधिकारी सकाळी ११:३० व १२:०० वाजेपर्यंत या ठिकाणी नगरपंचायत हॉलमध्ये उपस्थित झाले नाहीत . त्यानंतर आम्हाला नगरसेवकाना कोणालाच माहीत नाही . पिठासिनाधिकारी कुठे गेले का आलेत नाहीत तेव्हा चौकशी आणि म्हणून लगेच कलेक्टर महोदयाशी संपर्क केला . धुळ्याच्या मॅडमची त्यांना सर्व निवेदन सांगितल .१२ वाजता त्यांना सांगितलं आमदार महोदयांनी यांनी सुद्धा सांगितलं त्यांच्या नंतर नगरसेवकांनी फोन केले. गावित यांनीही सुद्धा फोन केले. कलेक्टर मध्ये यांना पण व्यवस्था करते मी सांगते असं करून त्या हा टाइमपास केलेल आहे. आत्ताची ही जी वेळ आहे सायंकाळचे पाच वाजेल तोपर्यंत पिठासिनधिकारी दुसरा दिलेला नाही . जर काही पीठा-सिनधिकारी आले नाहीत तर त्या ठिकाणी ही सभा रद्द करता येत नाही . ती तात पुरता स्थगित केली असेल , जर केल्या नंतर एक दोन तासानंतर आहे त्याच ठिकाणी ही सभा घेणे आवश्यक आहे . अशी कायद्याची तरतूद आहे. परंतु अधिकारी हे आपल्या अधिकाराचा गैरवापर पद्धतीने वापर करीतं आहेत. कलेक्टर ही त्यांचा अधिकाराचा गैर वापर करता आहेत . आणि म्हणून या ठिकाणी त्यांनी पिठासिनाधिकारी हा नेमला पाहिजे अजूनही वेळ आहे . त्यांना धुळ्याहून साक्री यायला अर्धा तास किंवा ४५ मिनिट लागतात ते येण्या हि पेक्षा त्यांनी साक्रीनगर पंचायत चे मुख्य अधिकारी यांनाच अधिकार द्यावा पिठासिनअधिकारी नियमावर अन्यथा धुळ्यावरण एक पिठासीनअधिकारी नेमाव ते येथे येतील ही सभा पूर्ण होईल शिवसेना जिल्हाप्रमुख तुळशीराम गावित चंद्रजीत भैय्या कसे त्यांनी सांगितले आहे. शिवसेना व भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते या रस्ता रोको आंदोलनात उपस्थित होते .

# नव्या नवरीची वरात, थेट पोलीस ठाण्याच्या दारात, सटाणा येथिल घटनेने खळबळ

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------

"लग्न म्हणजे साता जन्माच्या गाठी, आयुष्यभराची साथ", अशा पूर्वापार चालत आलेल्या धारणेला सटाणा येथिल एका विवाहाने आश्चर्यचकीत धडा दिला आहे. चित्रपटाला शोभावी अशा कथेने सर्वांचेच लक्ष वेधले आहे.

या विवाह नात्यातील नव्या नवरीने अशी काही करामत केली की, तिची वरात थेट पोलीस ठाण्याच्या दारात पोहचली आहे. काही दिवसांपूर्वी नंदू झिप्रू पानपाटील (रा. रावळगाव) व रंजना झिप्रू पानपाटील यांची कन्या मिना हिचा विवाह सटाणा येथिल एका प्रतिष्ठित घराण्यात झाला होता. मीना हीने गोडीत विवाह केला, विवाह झाल्यावर सर्वांशी मिळून मिसळून वागलीही, मात्र पहिल्या मुळ साठी माहेरी जाताना घरातील सोने, महागडे कपडे गुंडाळून सोबत घेऊन गेली.

नवरी माहेरी पहिल्या मुळ साठी गेली म्हणून सासरचेही निवांत होते, दुसऱ्या दिवशी जेव्हा सासरची मंडळी नव्या नवरीला आपल्याकडे आणण्यासाठी जाऊ लागले, तेव्हा नवरीच्या घरचे सासरच्या लोकांना उडवा-उडवीचे उत्तरं देऊ लागले, यावरुन सासरच्या लोकांना शंका येऊ लागली, त्यानंतर सासरच्या लोकांनी खोलात जाऊन विचारपुस केली तर लक्षात आले की, नवी नवरी लग्नाच्या नवऱ्याला सोडून अन्य विवाहीत व्यक्तिबरोबर पळून गेली. त्यानंतर सासरच्या लोकांनी घरातील सोने, महागडे कपडे यांची तपासणी केली तर तो सर्व ऐवज नवी नवरी तीच्या सोबत पळवून घेऊन तीने पोबारा केल्याचे निष्पन्न झाले. याविषयी वडनेर खाकुर्डी पोलीस ठाण्यात तीच्या पळून जाण्याविषयी खबर देखील दाखल तिच्या घरच्यांनी केली, पोलीस व घरच्यांनी तपास केला असता ती अहमदाबाद येथे घराजवळील एका विवाहीत पुरुषासोबत पळून गेल्याचे समोर आले.

नव्या नवरीने केलेली ही करामत सर्वांसाठीच धक्कादायक होती, त्यामुळे तीच्या सासरच्या लोकांनी सटाणा पोलीस ठाणे येथे धाव घेत मिना हिच्यासह तिचे आई-वडील, तीचा प्रियकर तसेच अन्य व्यक्तिंविरोधात, फसवणूक व चोरीसारख्या गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल झाला. मिनाच्या या करामतीमुळे नव्या नवरीची वरात थेट पोलीस ठाण्याच्या दारात अशी चर्चा सर्वत्र होऊ लागली. या घटनेचा तपास पोलीस निरिक्षक बोरसे, व अमंलदार पवार करीत आहेत. येथून पुढे अशी कोणाची फसवणूक होऊ नये म्हणून सासरच्या लोकांनी पोलीसांकडे आपले गाऱ्हाने मांडले आहे. कठोरातील कठोर शिक्षा अशा ठगांना व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# राजर्षि शाहू महाराज जयंतीनिमित्त पोलीस अधीक्षक कार्यालयात अभिवादन कार्यक्रम संपन्न

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------



राजर्षि शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त गोंदिया पोलीस अधीक्षक कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचा उत्साही माहोल पाहायला मिळाला. सामाजिक न्याय आणि समतेचे अग्रदूत असलेल्या राजर्षि शाहू महाराजांना अभिवादन करण्यासाठी पोलीस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसह अंमलदार मोठ्या संख्येने एकत्र आले होते. या कार्यक्रमात मा. श्री. गोरख भामरे, पोलीस अधीक्षक, गोंदिया यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांमध्ये –
उपविभागीय पोलीस अधिकारी, आमगाव – श्री प्रमोद मडामे
उपविभागीय पोलीस अधिकारी, गोंदिया – सौ. रोहिणी बानकर
उपविभागीय पोलीस अधिकारी, देवरी श्री विवेक पाटील
प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह) – श्री रामदास शेवते
पोलीस निरीक्षक, स्था. गु. शा. – श्री पुरुषोत्तम अहेरकर
रापोनि अधिकारी – श्री रमेश चाकाटे

यासह पोलीस विभागातील अनेक अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार, थोर समाजसुधारक व राष्ट्रपुरुषांची जयंती शासकीय कार्यालयात साजरी करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले असून, याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. राजर्षि शाहू महाराजांचा विचार हा आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याची जाणीव आणि प्रेरणा प्रत्येक प्रशासनिक अधिकाऱ्याला सतत प्रेरणादायी ठरते, हेच या कार्यक्रमातून अधोरेखित झाले.

# "दारुविक्रीला आळा घाला अन्यथा साक्री पोलीस ठाण्यावर मोर्चा !" - विटाईतील तरुणांचा एल्गार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------




साक्री तालुक्यातील विटाई या गावी दारूबंदीचा निर्णय घेतलेला असूनही, गेल्या अनेक वर्षांपासून गावात बेकायदेशीर दारू विक्री सुरूच असल्याने विटाई गावातील तरुणांनी आता पोलिसांच्या विरोधात एल्गार पुकारला आहे. पोलीस प्रशासनाच्या निष्क्रीयतेमुळे संतप्त झालेल्या तरुणांनी थेट इशारा दिला आहे की, येत्या दोन दिवसांत कारवाई न झाल्यास महिलांसह साक्री पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात येईल. विटाई गावात मागील ७– ८ वर्षांपासून दारूबंदी असली तरीही एक-दोन ठिकाणी खुलेआम दारू विक्री सुरू आहे. गावकऱ्यांनी दोन महिन्यांपूर्वीच साक्री पोलीस ठाण्यात ग्रामपंचायतीच्या लेटरपॅडवर लेखी तक्रार सादर केली होती. पोलीस प्रशासनाने आजतागायत कोणतीही ठोस कारवाई केली नाही. तरुणांनी घेतला पुढाकार; गावात दारूबंदी पूर्णपणे लागू करण्यासाठी सामाजिक चळवळ सुरू. दखल न घेतल्यास पोलीस ठाण्यावर महिलांसह तीव्र आंदोलन करण्याचा इशारा मीडियामार्फत. दारूबंदी असताना काही ठिकाणी खुलेआम दारू विक्री होत असेल तर यामागे पोलिसांचे दुर्लक्ष आहे की मिलीभगत? असा सवाल आता जनतेतून विचारला जात आहे. लेखी तक्रारीला प्रतिसाद मिळत नसल्याने लोकशाही मार्गाने आंदोलनाची दिशा गावकऱ्यांनी घेतली आहे. विटाईतील तरुणांनी स्पष्ट केले की, गावाच्या आरोग्यासोबत आणि सामाजिक वातावरणाशी खेळ करणाऱ्यांना माफ केले जाणार नाही. शासनाने लागू केलेली दारूबंदी केवळ कागदावर न राहता कृतीत उतरावी यासाठी गावकऱ्यांचा लढा सुरू झाला आहे. दारूच्या विळख्यातून गावाला मुक्त ठेवायचे असेल, तर पोलीस प्रशासनाने त्वरित कारवाई करत अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा, जनतेचा उद्रेक रोखता येणार नाही. अशी प्रतिक्रिया गावातील तरुणांनी दिली आहे.

# संजीव अहिरे यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------




मनुमानसी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व महाविर इंटर नॅशनल नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या वयाच्या पन्नास वर्षा पुढील विविध क्षेत्रात जसे की सामाजिक, अध्यात्मिक , सांप्रदाईक, आरोग्य संवर्धनसेवा, पत्रकारिता, कवी लेखक संपादक इ . .इ .क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्तिंचा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार येते. २९ जुन २०२५ रोजी नाशिक येथे आयोजित करण्यात येणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यात धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील म्हसदी येथील नाशिकस्थित सेवानिवृत्त प्रेस कर्मचारी गुणवंत कामगार पुरस्कार्थी संजीव काशिनाथ आहिरे यांना कामगार सेवेसाठी जेष्ठमान्यवरांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येऊन सन्मानित करण्यात येणार आहे . पुरस्काराचे स्वरूप शॉल , श्रीफळ, बुके, सन्मानपत्र, स्मृती चिन्हे , व मानाचा फेटा बांधून संजीव अहिरे यांना गौरविण्यात येईल तशा आशयाचे निवडपत्र संस्थेच्या संस्थापिका मेघाताई शिंपी व इतर मान्यवरांच्या नामनिर्देश असलेले निवड पत्र प्राप्त झाले आहे. संजीव अहिरे यांना या आधीही विविध संस्थांचे राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याने कामगार व साहित्य क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# नूतन मराठा विद्यालय छडवेल कोरडे येथे छत्रपती राजश्री शाहू महाराज यांना अभिवादन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------

आज २६ जून २०२५ रोजी नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे येथे छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती व जागतिक अंमलीपदार्थ सेवन विरोधी दिन साजरा करण्यात आला . याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य मा.रावसाहेब संजयकुमार पाटील, पर्यवेक्षक श्री.रघुनाथ नागरे, शिक्षक प्रतिनिधी श्री.हरकलाल पवार, सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू आणि भगिनी यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. छत्रपती शाहू महाराज यांच्या विषयी माहिती दिनविशेष स्वरूपात श्री.निलेश साळुंखे यांनी सांगितला.त्यात त्यांनी शाहू महाराज हे एक सक्षम





राज्यकर्ते होते.शाहू महाराजांनी अनेक पुरोगामी धोरणे यशस्वीपणे राबवली. ब्रिटिशांची सलोखा राखून त्यांच्याकडून विविध विकासकामे ही त्यांनी करून घेतले तर जागतिक अंमलीपदार्थ सेवन विरोधी दिन याबद्दल माहिती श्री.हर्षल खैरनार यांनी सांगितली.*माननीय प्राचार्य रावसाहेब संजयकुमार पाटील हे आपल्या मनोगतात करवीर चे भाग्यविधाते राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे नावापुढे सर्व जाती धर्मांचे लोक नतमस्तक होतात. कारण ते सर्व जाती धर्माचे लोकांना न्याय देत.कलाकारांचा आश्रयदाता , मल्लांचा पोशिंदा अशी कितीतरी विशेषण छत्रपती शाहू महाराजांच्या नावामागे लागतात. यात शब्दांचेच भाग्य की त्यांना शाहू महाराजांच्या नावावर आपले स्थान पक्क करता आल. ०६ मे १९२२ या दिवशी करवीरचा हा भाग्यविधाता काळाच्या विशाल पटलावर आपल्या कर्तुत्वाची मोहोर उमटवून निघून गेला. अशा महान न्यायी नेत्यास लोकराजा राजर्षी शाहू महाराजांना साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी व नूतन मराठा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय छडवेल कोर्डे यांच्या वतीने विनम्र अभिवादन.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री काशिनाथ गांगुर्डे यांनी केले.

# साक्री नगरपंचायतचा अविश्वास ठरावात केलेले आरोप बिन बुडाचे व अत्यंत चुकीचे, दिशाभूल करणारे! नगराध्यक्ष :जयश्रीताई पवार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
+--------------------------

साक्री नगरपंचायत च्या १२ नगरसेवकांनी अविश्वास ठराव दाखल करताना केलेले आरोप अत्यंत चुकीचे व साक्रीकर जनतेची दिशाभूल करणारे आहेत असा खुलासा नगराध्यक्ष जयश्री पवार यांनी एका पत्रकाद्वारे केला आहे. नगराध्यक्ष जयश्री पवार यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की साक्रीकर मायबाप जनतेने ४० वर्षानंतर भारतीय जनता पक्षाच्या हाती बहुमताने नगरपंचायतीची सत्ता सोपवली मात्र विरोधकांना पराभव पचनी पडला नाही. त्यांनी खोट्या ३०२ च्या गुन्ह्यात नगरसेवकांना व प्रमुख सक्रिय कार्यकर्त्यांना गोवण्याचा प्रयत्न केला. त्यातूनही हाती काहीच न लागल्यामुळे नगरपंचायतचा कारभार करताना अनंत अडचणी आमच्याकडे उभ्या केल्यात. शासकीय निधी मिळू दिला नाही, आमदार मंजुळा गावित यांनी नगर विकास विभागाची निधी शेजारील शहरात खर्ची घातला.



मी एक आदिवासी भिल्ल महिला असताना आमच्याच पक्षाचे गटनेते व उपनगराध्यक्ष बापू गीते यांच्याशी हात मिळवणे करून माझ्यावर खोटे आरोप करणे सुरू केले. त्यांना माझ्या कामात हस्तक्षेप करण्यास प्रोत्साहन दिले, तत्कालीन मुख्याधिकारी यांच्या माध्यमातून काही अनियमित कामांना प्रोत्साहन दिले आमदार मंजुळा गावित यांनी आपल्या मर्जीतील मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती करून गटनेते व उपनगराध्यक्ष बापू गीते यांच्याशी हात मिळवण करून माझ्यावर खोटे आरोप करणे सुरू केले.स्वतः मनमानी कारभार करावयाचा व आरोप माझ्यावर करायचा साक्रीनगर पंचायत च्या येणाऱ्या प्रत्येक मुख्याधिकारी यांना हाताशी धरून चुकीचे कामे करण्यासाठी सातत्याने माझ्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. वास्तविक मी सर्व सत्ताधारी नगरसेवकांना विश्वासात घेऊन निधीचे वाटप केले कुठेही देयक काढण्यासाठी अडकाठी केली नाही. फक्त चांगली कामे झाली पाहिजेत एवढाच अग्र धरला नगराध्यक्ष बापू गीते यांनी गटनेते पदाची जबाबदारी प्रामाणिकपणे बजावली नाही, पक्षाच्या नगरसेवकांच्या बैठका घेतल्या नाहीत, शहर विकासाच्या कामांची चर्चा केली नाही, मी वेळोवेळी बोलावलेल्या बैठकांना नगरसेवकांना येऊ दिले नाही. काही महत्त्वाच्या व अत्यंत तातडीच्या विषयावर काढलेल्या बैठकीचा अर्ज स्वीकारण्यास सभापतींना मज्जाव केला. ठराविक मलिदा देणाऱ्या ठेकेदाराला हाताशी धरून स्वतःच मनमानी पद्धतीने नगरपंचायतच्या कारभारात हस्तक्षेप केला प्रभाग क्रमांक ९ मधील १९ लाखाच्या रस्त्याचे काम न करता परस्पर बिल काढून घेतले. मी या कामाची चौकशी केल्यानंतर जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडे विशेष सभेचे आयोजन करण्याचा अट्टाहास धरून काम बदलचा विषय मंजूर करण्यास भाग पाडले. अशा पद्धतीने चुकीचे काम करणाऱ्या भाजपाचे गटनेते सामील झाल्याने व उर्वरित काळासाठी चुकीच्या पद्धतीने काम करण्यास करताना माझी अडकाठी राहू नये म्हणून विरोधकांची हात मिळवणी करून माझ्यावर अविश्वास ठराव दाखल केला.

माझ्या अडीच वर्षाच्या कार्यकाळानंतर मला पक्षश्रेष्ठींनी आदेश दिला असता तर मी माझ्या नगराध्यक्ष पदाचा राजीनामा देण्यास तयार होती. मात्र उपाध्यक्षपदाचा कार्यकाळ सव्वा वर्षाचा उरलेला असतानाही बापू गीते यांनी पक्षश्रेष्ठी व नगरसेवकाच्या मागणीनंतर ही राजीनामा दिला नाही, गेल्या साडेतीन वर्षापासून ते उपनगराध्यक्ष पदाला चिकटून बसले आहेत. नगरपंचायतीत पक्षाचे बहुमत असताना विरोधकांची हात मिळवणे करण्याची गरज का आली? पक्षश्रेष्ठींकडे विषय मांडून त्यावर तात्काळ तोडगा निघाला असता. मात्र विरोधकांचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी बापू गीते यांनी पक्षविरोधी भूमिका घेऊन पक्षाची शिस्त मोडून पक्षाशी एकनिष्ठ असलेला इतर चार नगरसेवकांना व्हीप बजावून व अविश्वासाच्या बाजूने मतदान करा अन्यथा तुमच्यावर कारवाई केली जाईल, असा " उलटा चोर कोतवाल को डाटे" या नीतिने साकरीकर मायबाप जनतेची दिशाभूल चालवलेली असल्याचे नगराध्यक्ष सौ. जयश्री पवार यांनी म्हटले आहे.

# प्रहार शिक्षक संघटनेमार्फत नूतन प्राथमिक शिक्षणाधिकारी भानुदास रोकडे यांचा सत्कार, नाशिक पदवीधर मतदार संघाचे आ किशोरभाऊ दराडे यांच्याकडे प्रहार शिक्षक संघटनेच्या मागणीला यश

नंदुरबार प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग मागील एक वर्षापासून प्राथमिक शिक्षणाधिकारी पद रिक्त होते. परिणामी शिक्षण विभागात अनागोंदी कारभार निर्माण झाला होता. याकडे महाराष्ट्र राज्य प्रहार शिक्षक संघटनेने चिंता व्यक्त केली होती. अखेर महाराष्ट्र राज्य प्रहार शिक्षक संघटनेच्या सततच्या पाठपुराव्यामुळे श्री.भानुदास रोकडे नूतन प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून नंदुरबार जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात नुकतेच रूजू झाले. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात नियमित प्राथमिक शिक्षणाधिकारी मिळाल्याने प्रहार शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. श्री भानुदास रोकडे नूतन प्राथमिक शिक्षणाधिकारी यांचा सत्कार पुष्पगुच्छ, शाल, पुस्तक, देऊन सन्मान करताना महाराष्ट्र राज्य प्रहार शिक्षक संघटनेचे जिल्हा मार्गदर्शक संजय गावित, जिल्हा अध्यक्ष गोपाल गावित, दिलीप गावित रायगण माजी केंद्रप्रमुख नवापूर तालुका, शरद गावित केंद्रप्रमुख करंजी, अक्कलकुवा तालुका हंन्सारी एजाज, तळोदा तालुका अन्सारी रशीद अहमद, बालाजी जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

नंदुरबार जिल्हा परिषद शिक्षण विभाग नेहमी वादाच्या भोवऱ्यात अडकला होता. प्राथमिक शिक्षणाधिकारी पदावर श्री. सतीश चौधरी असताना शिक्षण विभागाची कामगिरी काळवंडलेली होती. पैसे देवाण-घेवाण करत असताना अँटी करप्शनच्या जाळ्यात अडकले होते. त्यांचेवर निलंबित होण्याची वेळ आली होती. त्यानंतर जिल्हा परिषद प्रशासनाने श्रीमती वंदना वळवी यांचेकडे प्रभारी प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा पदभार सोपवला होता. त्यांचा देखील कारभार समाधान कारक नव्हता. यामुळे शिक्षक संघटना नाराजी व्यक्त करत होते. नंदुरबार जिल्हा परिषद शिक्षण विभागात कायमस्वरूपी प्राथमिक शिक्षणाधिकारी मिळावा. यासाठी महाराष्ट्र राज्य प्रहार शिक्षक संघटनेच्या माध्यमातून नाशिक



पदवीधर मतदार संघाचे आमदार किशोरभाऊ दराडे यांच्या शिक्षक दरबार नंदुरबार येथे आयोजित कार्यक्रमात मागणी करण्यात आली होती. न्यायपूर्ण लढा दिला. न्याय लढ्याला अखेर यश आले आहे. प्रशासनाचेही आभार मानले आहे. नंदुरबार जिल्हा परिषद शिक्षण विभागात नवे प्राथमिक शिक्षणाधिकारी श्री.भानुदास रोकडे म्हणून रूजू झाले आहे. त्यांच्या नवीन नियुक्तीमुळे जिल्हा परिषद शिक्षण विभाग भ्रष्टाचारापासून मुक्त होणार, असा आशावाद महाराष्ट्र राज्य प्रहार शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्यातील शिक्षण सेवा गट अ प्रशासन शाखेमधील तत्सम पदावर कार्यरत असणाऱ्या अनेक अधिकाऱ्यांची शिक्षणाधिकारी प्रशासन शाखा वर्ग एक या पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. विशेष बाब म्हणजे या पदोन्नतीमध्ये नंदुरबार जिल्ह्यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी श्री. भानुदास रोकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहेत. मागील एक वर्षांपासून नंदुरबार मध्ये केवळ प्रभारी अधिकारी शिक्षणाधिकारी पदावर कार्यरत होते. या शासन निर्णयामुळे अनेक वर्षांनंतर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाला स्वतंत्र शिक्षणाधिकारी प्राप्त झाले आहेत. नंदुरबार जिल्ह्यामध्ये मागील एक वर्षांपासून केवळ एक अधिकारी प्राथमिक विभागांचा कार्यभार सांभाळत होते. शालेय शिक्षण विभागाच्या या शासन निर्णयामुळे नंदुरबार जिल्ह्यांमध्ये शिक्षणाधिकारी पदाची असणारी कमतरता दूर झाली आहे. विशेष बाब नियुक्त झालेल्या या अधिकाऱ्यांनी यापूर्वी नंदुरबार जिल्ह्यामध्ये काम पाहिलेले आहे. उप शिक्षणाधिकारी म्हणून अतिशय उत्कृष्ठ काम केले आहे. याकाळात त्यांनी प्राथमिक शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न केले होते. विविध शैक्षणिक उपक्रमांच्या अंमलबजावणी मध्ये त्या अग्रभागी असतात. त्यांना उत्तम अनुभव आहे. प्रशासन व शालेय गुणवत्तापूर्ण शिक्षण या प्राथमिक विभागामध्ये शिक्षणाधिकारी श्री. भानुदास रोकडे यांना असणाऱ्या दीर्घ अनुभवाचा फायदा नंदुरबार जिल्ह्यातील वाडी, वस्ती, पाड्यातील दुर्गम भागातील शिक्षण विभागाला होणार आहे. त्यांच्या संवाद कौशल्याचा फायदा जिल्ह्यातील प्राथमिक शाळांना होणार आहे. महाराष्ट्र राज्य प्रहार शिक्षक संघटना नंदुरबार जिल्हाध्यक्ष गोपाल गावीत यांनी त्यांचे स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या तसेच जिल्हयातील प्राथमिक स्तरावरील सर्व प्रलंबित प्रश्न नूतन प्राथमिक शिक्षणाधिकारी श्री. भानुदास रोकडे हे प्राधान्याने सोडवतील अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थी, लोकप्रिय आणि कर्तव्यदक्ष अधिकारी, आपल्या कामावर निष्ठा ठेवून शिक्षण क्षेत्रातील सकारात्मक बदलासाठी झटणारे शिक्षणाधिकारी श्री. भानुदास रोकडे अशी त्यांची ख्याती आहे. शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कमागिरीबद्दल आणि अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना मिळालेली नियुक्ती ही नंदुरबार जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या शिरपेचातील अभिनंदनची विशेष बाब आहे. असेही मत जिल्हाध्यक्ष गोपाल गावित यांनी व्यक्त केले आहे.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# नाशिकची आराध्या निकम होणार जगातील सर्वात लहान लेखिका विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी पुस्तक होणार प्रकाशित

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत
-------------------------

नाशिक येथील कृषी उद्योजक व बिझनेस कोच श्री. भूषण निकम यांची मुलगी कुमारी आराध्या निकम, केवळ आठ वर्षांची असतानाच, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी पुस्तक लिहून 'जगातील सर्वात लहान लेखिका' म्हणून नाव लौकिक मिळवण्याच्या वाटेवर आहे, "बेकमिंग ए स्मार्ट स्टुडंट्स"

असे या पुस्तकाचे नाव असून, हे पुस्तक मराठी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये प्रकाशित होणार आहे, आराध्या ही सध्या ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल, नाशिक येथे इयत्ता चौथी शिक्षण घेत असून एवढ्या लहान वयातच तीने विद्यार्थ्यांच्या मानसिक, शारीरिक, बौद्धिक व नैतिक विकासावर अभ्यास करून हे पुस्तक लिहिले आहे.

या पुस्तकात विद्यार्थ्यांनी कोणत्या सवयी अंगीकाराव्यात जसे की व्यायाम व योगाचे फायदे, आहार कोणता असावा, मैदानी खेळ आणि त्याचे महत्त्व, सकारात्मक विचार, अभ्यासाची जागा कशी




आणि कोणती असावी कोणती वेळ अभ्यासासाठी निवडावी, दैनंदिन दिनचर्यात कोन कोणत्या बाबी असाव्या , बॅड टच आणि गुड टच सवयी कोणत्या असाव्या तसेच देशभक्ती विषयी जागरूकता या सारख्या विविध गुणांचा समावेश या पुस्तकात आराध्याने अगदी बारकाईने केलेला आहे, हे पुस्तक केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांचे समग्र व्यक्तिमत्व घडवण्याचा प्रयत्न करते, हे पुस्तक नर्सरीपासून ते पोस्ट-ग्रॅज्युएशनपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी, तसेच प्रत्येक शिक्षक आणि पालकांनी देखील वाचून आचरणात आणवे असेच आहे.

या पुस्तकाचे पोस्टर प्रमोशन विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात होत आहे. नुकतेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे तसेच कृषी तज्ज्ञ आबासाहेब मोरे, नगरसेवक दामोदर मानकर



व अभिमन्यू काशीद यांसारख्या मान्यवरांनी आराध्याच्या कार्याचे कौतुकाची थाप दिली व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

पुस्तकाची विशेष बाब म्हणजे या पुस्तकासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे सरचिटणीस नितीन ठाकरे अशा विविध मान्यवरांनी लेखी स्वरूपात शुभेच्छा दिल्या आहेत.. आराध्याच्या या यशामध्ये ग्लोबल इंटरनॅशनल स्कूलचे चेअरमन तसेच प्राचार्य बिन्सी वर्गेसे, आणि क्लास टीचर श्रीमती श्रद्धा पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

असे हे अनमोल स्वरूपाचे पुस्तक पुढील आठवड्यात अधिकृतपणे प्रकाशित होणार असून, सध्या वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे, या ऐतिहासिक घडामोडीचा भाग बनण्याची संधी शाळा, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

"आजच्या धकाधकीच्या जीवनात पालकांना मुलांकडे वेळ देणे कठीण झाले आहे, त्यामुळे केवळ अभ्यास नव्हे तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक आहे, हे पुस्तक विद्यार्थ्यांना जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे."
**भूषण निकम,**
**बिझनेस कोच व आराध्याचे मार्गदर्शक**

माझे पप्पा नेहमी पुस्तके लिहतात त्यांचे अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत आणि अनेकांना करियर साठी मार्गदर्शन करतात मला हे पुस्तक लिहिण्याची प्रेरणा त्यांच्याकडूनच मिळाली असून त्यांनी मला या पुस्तकासाठी फार मोलाची मदत केली, त्यांच्यासारखेच मला पण अजून खूप सारी पुस्तके लिहायची आहेत आणि यातून मला शिक्षण आणि उद्योग क्षेत्रात मोठे काम करायचं आहे.
**लेखिका**
**कु. आराध्या निकम**

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!





महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**